# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – १८ मार्च २०१६

## मुंबई विद्यापीठाची बीबीए- एलएलबी (ऑनर्स) सामायिक प्रवेश प्रक्रिया ३० एप्रिल २०१६ ला

मुंबई- मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय विधी महाविद्यालय (University National Law School) फोर्ट,मुंबई आणि ठाणे उपकेंद्रातील विधीच्या बीबीए-एलएलबी (ऑनर्स) २०१६-१७ या पाच वर्षीय इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाची सामायिक प्रवेश प्रक्रिया MUCLET ( Mumbai University Common Law Entrance Test ) ३० एप्रिल २०१६ रोजी घेण्यात येणार आहे. ही प्रवेश प्रक्रिया ठाणे उपकेंद्र आणि मुंबई विद्यापीठ फोर्ट येथे घेण्यात येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेसाठी २१ मार्च २०१६ पासून प्रवेश अर्ज उपलब्ध करुन दिले जाणार असून २२ एप्रिल २०१६ पर्यंत दोन्ही केंद्रावर प्रवेश अर्ज स्विकारले जाणार आहेत. प्रवेशअर्ज विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. १२ वीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तसेच ज्या विद्यार्थ्यांनी या वर्षी १२ ची परीक्षा दिली आहे अशा विद्यार्थ्यांना या प्रवेशप्रक्रियेला बसता येणार आहे. राखीव प्रवर्गासाठी ४० टक्के गुणांची अट तर खुल्या प्रवर्गासाठी ४५ टक्के गुणांची अट असणार आहे.

राष्ट्रीय स्तरावर उद्योग,व्यवसाय आदी क्षेत्रात होत असलेल्या बदलांचा वेध घेऊन विद्यापीठाने हा अभ्यासक्रम तयार केला आहे.या सामायिक प्रवेश प्रकियेसाठी सामान्य ज्ञान,इंग्रजी व्याकरण,चालू घडामोडी,सामान्य गणित,बौध्दिक चाचणी,शब्दसंग्रह इत्यादींचा समावेश असेल.बीबीए- एलएलबी (ऑनर्स) या अभ्यासक्रमामध्ये विधी व व्यवस्थापन या विषयांचा समावेश असून प्रात्यक्षिकावर भर देण्यात येणार आहे.तसेच वेगवेगळ्या उपक्रमाद्वारे आणि न्यायालयीन प्रणालीच्या माध्यमातून कौशल्य व तंत्रज्ञानाद्वारे विद्यार्थ्यांना अवगत केले जाणार आहे.

प्रवेश प्रक्रियेसंबधी सर्व माहिती विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच अधिक माहितीसाठी ०२२-२२७०८७२५,९९६७८६१७३५,९८२०३०८५८२ (फोर्ट कॅम्पस ) आणि ०२२-२५३३९३२३,९६१९१२२८७३ (ठाणे उपकेंद्र ) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे संचालक प्रा.डॉ.अशोक येण्डे यांनी कळविले आहे.

लीलाधर बन्सोड ,उपकुलसचिव (जनसंपर्क / प्रकाशन / सांख्यिकी )